**ISSN: 2454 – 7905**

*SJIF Impact Factor 2022: 7 . 479*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I  ISSUE - XLV  Year – 7  12 Jan. 2022**

**विशेष अंक**

**जनप्रगती बहूउद्येशीय सेवाभावी संस्था नांदेड तथा सिध्दी प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने**

# स्वामी विवेकानंद जीवन परिचय, कार्य, सेवाभाव आणि विचार

**Special Issue**

**Editor by**

**Dr. Rajesh Gangadharrao Umbarkar**

Dept. of Economics

N. S. B. College, Nanded.

**Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskriti Public School, Nanded. (MH. India) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com

**Director : Mr. Tejas Rampurkar**

(For International contact only +91-8857894082)

**Address for Correspondence :** House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India -Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com

rajesh@yahoo.com **Mob. No:** +91-9623979067 **Website: www.wiidrj.com**

| | | | |
|---|---|---|---|
| 59. | भारताच्या विकासामध्ये स्वामी विवेकानंद यांच्या विचाराची उपयुक्तता | प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे | 188 |
| 60. | **स्वामी विवेकानंद यांचे सामाजिक विचार व कार्य** | **वाढवे क्षमता दादाराव** | 191 |
| 61. | "स्वामी विवेकानंदाच्या राजकीय विचारांचा वारसा" एक विश्लेषनात्मक अध्ययन | डॉ. एन. आर. चिमुरकर | 193 |
| 62. | स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक आणि धार्मिक विचार | प्रा. देसाई कोमल पंडितराव | 197 |
| 63. | शिकागोतील सर्वधर्म परिषद | प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील | 200 |
| 64. | स्वामी विवेकानंद –युवकांचे प्रणेते | डॉ. किर्तनकार आर. व्ही | 204 |
| 65. | **स्वामी विवेकानंदाचे सामाजिक विचार** | **डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख** | 208 |
| 66. | **स्वामीजीचे शिक्षणविषयक विचार** | **प्रा. गणेश जानराव मस्के** | 211 |
| 67. | **स्वामी विवेकानंद और राष्ट्रवाद : एक परिकल्पना** | **डॉ. गीता**<br>**डॉ. ओकेन्द्र** | 213 |
| 68. | स्वामी विवेकानंदाचे बालपण | प्रा. सुशा लक्ष्मण होंडकर | 216 |

# शिकागोतील सर्वधर्म परिषद

**प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील**

सहाय्यक प्राध्यापिका

महिला रत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय मालेगाव

भारतात नव जागरणाचा शंखनाद करणाऱ्या महान राष्ट्र पुरुषांमध्ये स्वामी विवेकानंद यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्यांनी आपल्या अध्यात्मिक, धार्मिक, आधुनिक ज्ञानाच्या बळावर व ज्ञानाच्या दृष्टीद्वारे सर्व मानवी जगताला जीवन जगण्याची पद्धती व कला शिकविली. ते कर्मावर विश्वास ठेवणारे महान राष्ट्रपुरुष होते.

12 जानेवारी 1863 ला कोलकात्यात जन्माला आलेले नरेंद्रनाथ दत्त स्वामी रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य, योग आणि अध्यात्माचे साधक स्वामी विवेकानंद जी युवकांचे आदर्श तरुण तेजस्वी धर्म अभ्यासक प्रचारक तथा प्रसारक ,प्रखर वक्ते ज्यांनी हिंदू धर्म आणि त्यांचे विचार सातासमुद्रापार पोहोचवत हिंदू धर्माला मानाचे स्थान प्राप्त करून दिले .असे स्वामी विवेकानंद सर्व धर्माचे मूळ जनक अतिप्राचीन असा हिंदु धर्म सर्वसमावेशक आहे. हे ज्यांनी जगाला दाखवून दिले. गीता हा परमग्रंथ असून आदर्श व्यक्ती, आदर्श समाज, आदर्श देश आणि आदर्श विश्व व्यवस्था निर्माण करण्यास उपयुक्त आहे. आपण अशा धर्माचे आणि देशाचे नागरिक आहोत जिथे जगातील सर्व जाती धर्माचे लोक एकत्र सलोख्याने राहतात. हे अभिमानाने सांगणारे स्वामी विवेकानंद हिंदूंची सहिष्णुता हीच खरी ताकद आहे आणि सर्व मानव एक समान आहेत. असा संदेश त्यांनी जगाला दिला. त्यांच्या भाषणातून ,लिखाणातून आणि शिकवणीतून त्यांनी नेहमी युवावर्गाला प्रोत्साहित केले .प्रेरणा दिली अध्यात्म आणि ध्यानाच्या आधारे तुम्हाला जे हवे ते करता येऊ शकते. असे त्यांनी दाखवून दिले .त्यांनी रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशनची स्थापना करून आपले कार्य सुरू ठेवले .योग राजयोग आणि ज्ञानयोग यांच्या लिखाणातून युवकांना विशेष मार्गदर्शन केले

एका हाती गीता आणि दुसऱ्या हाती भगवान श्रीरामकृष्ण परमहंस यांचे विचार आणि मुखामध्ये प्रेम घेऊन स्वामी जगाच्या कानाकोपऱ्यात गेले. त्यातून अखिल मानव जातीच्या कल्याणाचा सर्वांच्या उन्नतीचा मार्ग सांगितला. आणि त्यामध्ये सर्वात जास्त भर दिला तो म्हणजे युवकांवर एका ठिकाणी ते युवकांना उद्देशून बोलतात नक्षत्र तारका सहित आकाश तुमच्यावर कोसळून तुमचे चूर्ण करून टाकेन. अशा मंत्राच्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहू नका थोड्याच वेळात ते तुमच्या पाया खाली आल्याचे तुम्हाला दिसून येई जरा धीर धरा तुम्हाला दिसून येईल की पैशाने नावलौकिकाने विद्येने कशानेही काही साधता येत नाही एक मात्र प्रेमानेच सारे साधता येते संकटाच्या अभेद्य भिंती चारित्र्याच्या बळाने पाडून टाकता येतात व मार्ग मोकळा करता येतो.

सोमवार 11 सप्टेंबर 1 93 हा दिवस जगातील धर्माच्या इतिहासात चिरस्मरणीय राहील .कारण याच दिवशी पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विचारांचे अमेरिकेच्या भूमीवर मिलन झाले .याच दिवशी विश्वबंधुत्वाचा शुभारंभ झाला. याच दिवशी प्राचीन भारताच्या वेदांत धर्माचे स्वामी विवेकानंदाकरवी त्या विराट अशा सर्वधर्मपरिषदेत सर्वात उच्च पद प्राप्त करून घेतले.

त्या दिवशी सकाळी धर्मगुरूंच्या मंत्रोच्चारानंतर संगीतमय वातावरणात धर्म परिषदेचा शुभारंभ झाला. व्यासपीठावर मध्यभागी अमेरिकेतील रोमन कॅथलिक पंथाचे धर्म प्रमुख कार्डिनल गिबन्स अध्यक्ष या नात्याने



Scanned with OKEN Scanner

विराजमान होते. त्यांच्या उजव्या व डाव्या बाजूस विभिन्न प्राच्य धर्माचे प्रतिनिधी बसले होते. स्वामी विवेकानंद हे कोणत्याही एका विशिष्ट पंथाचे प्रतिनिधी नव्हते.ते साऱ्या भारतवर्षातील सनातन वैदिक धर्माच्या प्रतिनिधीच्या नात्याने या परिषदेला आले होते.

व्यासपीठासमोर खालच्या बाजूला एक प्रशस्त हॉल होता .व त्याच्या मागे एक विस्तीर्ण गॅलरी होती .या गॅलरीत अमेरिकेतील आणि अन्य देशातील निवडक असे सहा सात हजार स्त्री पुरुषउपस्थित होते. व्यासपीठावर ख्रिश्चन धर्मातील मुख्य पंथाच्या प्रतिनिधी बरोबरच यहुदी, जैन, हिंदू ,बौद्ध, कन्फ्युसियन, सिंतो, इस्लामी आणि पारशी धर्माचे प्रतिनिधी आपापल्या राष्ट्रीय पोशाखात आसनस्थ होते.

या सर्व धर्म परिषदेत स्वामी विवेकानंद यांचे शेवटचे भाषण झाले .श्रीरामकृष्णाचे स्मरण करून स्वामीजी आपल्या जागेवरून उठले .अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधुंनो या शब्दांनी त्यांनी सभेला संबोधित केले .या शब्दात अशी काही अद्‌भुत शक्ती होती की स्वामीजींनी ते उच्चारताच शेकडो स्त्री-पुरुष आपल्या जागी उठून उभे राहिले .आणि टाळयांचा प्रचंड कडकडाट केला. लोकांचा हर्षध्वनि आणि टाळया थांबता थांबेनात. स्वामीजी त्या भावपूर्ण शब्दातील जिव्हाळयाने साऱ्या श्रोत्यांची हृदये स्पंदित झाली.

स्वामीजींच्या अगोदर त्यांनी पारंपारिक पद्धतीने श्रोत्यांना संबोधीत केले होते. परंतु भगिनींनो आणि बंधुंनो या शब्दांनी साऱ्या मानवजातीला आवाहन करणारे स्वामी विवेकानंद एकमेव वक्ते होते. वक्त्यांच्या हृदयातील भ्रातृभाव सर्वांच्या हृदयात प्रविष्ट झाला. आणि सारी हृदये थरथरली. एका क्षणात हजारो स्त्री-पुरुषांच्या हृदयात सारी मानवजात एक असल्याचा अनुभव तरळुन गेला.

लोकांच्या या आनंद उत्सवामुळे सुरुवातीची काही मिनिटे स्वामीजी वारंवार प्रयत्न करूनही काहीच बोलू शकले नाहीत .सारेच लोक भावनावशतेणे उभे राहिले होते. काही वेळाने सभा शांत झाली. मग स्वामीजींनी आपल्या गंभीर आवाजात एक छोटेसे भाषण दिले. त्यांच्या कमळ नेत्रातून जणू दिव्य ज्योती बाहेर पडत होती

आपल्या भाषणात स्वामी विवेकानंद म्हणाले की आपल्या प्रेमळ व उस्फूर्त स्वागत अन माझं हृदय भरून आले आहे .या स्वागताबद्दल मी जगातील सर्वात प्राचीन परंपरेच्या वतीने आपले आभार मानतो. सर्व धर्मांची जननी असलेल्या सर्व जाती पंथांच्या लाखो करोडो हिंदूंच्या वतीने आपल्याला मनःपूर्वक धन्यवाद देतो. पूर्वेकडील देशाकडून सहिष्णुतेचा विचार जगाला मिळाला आहे .असे या व्यासपीठावरून सांगणाऱ्या वक्त्यांचे आभार मानतो.

जगाली सहिष्णुता व सर्वसमावेशकतेचा संदेश देणाऱ्या धर्माचा एक भाग असल्याचा मला अभिमान आहे. आम्ही केवळ सर्वसमावेशकता आणि सहिष्णूतेवर विश्वास ठेवतो असं नाही तर जगातील प्रत्येक धर्माचा सत्य म्हणून स्वीकार करतो. जगाच्या पाठीवर सर्व देशातील आणि धर्मातील पीडित व गांजलेल्या लोकांना आश्रय देणाऱ्या देशाचा नागरिक असल्याचा मला अभिमान आहे. रोमन हल्लेखोरांनी ज्यांच्या धर्मस्थळाची तोडफोड केली त्या इस्रायलीनीही दक्षिण भारतात आश्रय घेतला होता त्या सर्वांच्या स्मृती आम्ही आमच्या हृदयात आजही जपून ठेवल्या आहेत. महान पारशी धर्माच्या लोकांना शरण देणाऱ्या व आजही त्यांचे पालन पोषण करणाऱ्या धर्माचा मी एक भाग आहे याचाही मला सार्थ अभिमान आहे.

बंधुंनो लहानपणापासून ऐकलेल्या आणि मुखोद्गत केलेल्या एका श्लोकाच्या ओळी आपल्याला ऐकण्याची माझी इच्छा आहे कोट्यावधी लोक आज या ओळीचे पारायण करतात त्याचप्रमाणे वेगवेगळया नद्या वेगवेगळया



Scanned with OKEN Scanner

ठिकाणी उगम पाहून अखेरीस समुद्राला मिळतात. त्याच प्रमाणे माणूस आपल्या इच्छेनुसार वेगवेगळे मार्ग निवडतो ते मार्ग सरळ असो की वाकडे तिकडे ते शेवटी भगवंतापर्यंत जातात

जो माझ्यापर्यंत येतो तो कसाही असो मी त्याचा स्वीकार करतो. कोणीही कुठलाही मार्ग निवडू अखेरीस माझ्यापर्यंत येतो आजची ही पवित्र परिषद भगवद्गीतेमधील या सिद्धाचाच पुरावा आहे.

सांप्रदायिकता, कट्टरता, कर्मठता आणि धर्मांधता बऱ्याच काळापासून पृथ्वीला आपल्या पंजाब जखडून टाकलं आहे या साऱ्यांनी पृथ्वीला हिंसाचाराने भरून टाकलं आहे अनेकदा ही पृथ्वी रक्तान लाल के लिये कितीतरी संस्कृतीचा नाश केला आहे आणि कितीतरी देश गिळून टाकले आहेत हे राक्षस नसते तर मानव समाज आज किती तरी विकसित झाला असता मात्र आता या राक्षसाचे दिवस भरले आहेत मला विश्वास आहे ही परिषद सर्व प्रकारची धर्मांधता सर्व प्रकारच्या वेदना मग त्यात तलवारी न झालेल्या असोत की लेखणीनं आणि माणसामाणसांमधील सर्व प्रकारच्या दुर्गुणांचा संहार करेल

भारत वर्षातील शाश्वत आणि आदर्श नीतिमूल्यांची ज्यांनी लोकांना ओळख करून दिली त्यांचे भाषण छोटेसे असले तरी ते उदार आणि सार्वजनिक भावाने पूर्ण होते सर्वांच्या भावनांना स्पर्श करणारे होते

स्वामीजींची शिकागो येथील भाषणे हा भारताच्या मुक्तीचा संक्षिप्त आले काही त्या भाषणांमध्ये त्यांनी हिंदु धर्माची आधुनिक युगाला उपयुक्त ठरेल अशी व्याख्या केली आहे त्या भाषणांमध्ये स्वामीजींनी हिंदू धर्माला विश्व धर्माची व्यापकता तर दिलीच पण त्याचबरोबर त्यात नवचैतन्य संचारित केले स्वामीजींनी हिंदू धर्म विश्ववंद्य केला

भगिनी निवेदितांनी लिहिले आहे .शिकागो धर्म परिषदेत स्वामीजी जेव्हा बोलायला उठले तेव्हा त्यांचा विषय होता हिंदूंचे प्राचीन धर्मविचार परंतु त्यांचे भाषण संपले तेव्हा आधुनिक हिंदू धर्माची निर्मिती घडून आली. स्वामीजींच्या भाषणामुळे समग्र भारताला आपल्या महान अशा भाव धारेचे मूल्यांकन करण्याची क्षमता प्राप्त झाली. स्वामीजी द्वारे भारताचे धर्म चैतन्य पश्चिमेकडे आपण होऊन प्रकट झाले.

27 सप्टेंबर हा धर्म परिषदेचा शेवटचा दिवस होता. स्वामीजींना उच्चतम सन्मान मिळाला होता. त्या स्थानावरून त्यांनी जगाला संदेश दिला. ते म्हणाले या सर्व धर्म परिषदेने जर जगाला काही सांगितले असेल तर ते हेच की पावित्र्य शुद्धता आणि दया शीलता या गोष्टी म्हणजे एका विशिष्ट संप्रदायाची मालमत्ता नाही.प्रत्येक धर्मामध्ये उदात्त चारित्र्याचे स्त्री पुरुष जन्मले आहेत असे असतानाही जर कोणी म्हणेल की अन्य सर्वधर्म विलयास जातील आणि आमचा हाच धर्म काय तो टिकून राहील तर अशा माणसाची मला कीवच वाटेल. मी येथे स्पष्टपणे सांगू इच्छितो की, अशा लोकांनी कितीही अडथळे उभे केले तरी त्या साऱ्यांना तिने मात्र न जुमानता प्रत्येक धर्माच्या पताकेवर लवकरच लिहिले जाईल युद्ध नको परस्परांना सहाय्य करा, विनाश नव्हे आत्मसात करा, कलह नको मैत्री व शांतता हवी.

स्वामी विवेकानंदांच्या या विचाराचा फार मोठा परिणाम झाला. त्यांनी वेदांताच्या वैश्विक वाणीचा त्या ठिकाणी प्रचार केला होता. त्यामुळे आर्य धर्म, आर्य जाती,. आर्यभूमी यांनी जगामध्ये प्रतिष्ठा लाभली हिंदू समाज पददलित असेल पण घृणास्पद नाही. तो दीन असेल दुखी असेल पण बहुमूल्य अशा पारमार्थिक संपत्तीचा उत्तराधिकारी आहे. धर्माच्या क्षेत्रात जगद्गुरु होऊ शकतो अशी त्यांची योग्यता आहे .अनेक शतकानंतर स्वामी विवेकानंदांनी आज आपल्या हिंदू समाजाला त्यांच्या वैचारिक सीमा किती विस्तृत आहेत हे दाखवून दिले. घृणा व



Scanned with OKEN Scanner

पमान यांच्या चिखलात बसलेल्या हिंदू धर्माला त्यांनी तेथून बाहेर काढले आणि त्या जागतिक धर्म परिषदेत अति च्च आसनावर विराजमान केले.

स्वामी विवेकानंद या अपूर्व विजयामुळे सारा भारत चैतन्यमय झाला. दारिद्र्याने पिचलेल्या या भूमीमध्ये ानंद नदीचा प्रवाह सर्वत्र पसरू लागला. स्वामीजींच्या या यशाचा प्रभाव आमच्या राष्ट्रीय जीवनावर सर्व दूर डला., फक्त धर्म आणि अध्यात्म या क्षेत्रातच नाही तर आमच्या सामाजिक आर्थिक, राजकीय जीवनावरही वामीजींच्या या विजयाचा व्यापक प्रभाव पडला त्या दिवसापासून आमचे राष्ट्र सर्वांगीण विकासाची वाटचाल करू ागले.

ंदर्भ:

1 स्वामी विवेकानंद संक्षिप्त चरित्र आणि उपदेश लेखक स्वामी अपूर्वानंद
2 विश्वगुरू विवेकानंद लेखक एम आई राजस्वी
3 अमेरिकेत स्वामी विवेकानंद लेखक भिडे निवेदीता
4 कोण होते स्वामी विवेकानंद लेखक सारंग संदीप



Scanned with OKEN Scanner